अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ७ फेब्रुवारी २०२५ । ▶ वर्ष : २३ वे ▶ अंक : १३० वा ▶ किंमत : ५ रुपये ▶ पाने ८




## कामती येथे रात्री अपघात; मोटार चालक ठार

सोलापूर : गावाकडे जात असताना समोरील ट्रॅव्हल्स कट मारल्याने मोटर खड्ड्यात कोसळून ड्रायव्हर गंभीर जखमी होऊन मरण पावला. हा अपघात कामती (ता.मोहोळ) येथे बुधवारी रात्रीच्या सुमारास घडला. धनाजी पांडुरंग भोसले (वय ५५, रा. कामती ता.मोहोळ) असे मयताचे नाव आहे. ते बुधवारी रात्रीच्या सुमारास आपल्या मोटारींतून मंगळवेढा मार्गवरून घराकडे निघाले होते. कटरे मंगल कार्यालयाजवळ त्याच दिशेने जाणारी ट्रॅव्हल्स कट मारल्याने मोटार रस्त्याच्या कडेला कोसळली. त्यात ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना सोमनाथ भोसले (पुतण्या) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

# माध्यमिक शिक्षण खात्यातील वरिष्ठ सहायक २० हजारांची लाच घेताना रंगेहाथ सापडला

सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील वरिष्ठ सहाय्यक या पदावर कार्यरित असणाऱ्या एका कर्मचाऱ्याला २० हजार रूपयांची लाच स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक खात्याच्या अधिकाऱ्यांनी रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरूवारी भर कार्यालयातच करण्यात आली. त्यावेळ शिक्षण विभागात एकच खळबळ उडाली. धनशाम अंकुश मस्के (वय ४३, रा.मरगू अपार्टमेंट यशवंत मिळ चाळजवळ) अक्कलकोट रोड याची अंगझडती घेतल्यानंतर २२ हजार रूपये आणि इतर भौतिक वस्तू सापडल्या.**

## भर कार्यालयात ॲन्टी करप्शन खात्याने केली कारवाई



याबाबतचे वृत्त असे की, एका ५३ वर्षाच्या सहशिक्षकाने यासंदर्भात लाचलुचपत प्रतिबंधक खात्याकडे तक्रार केली होती. तक्रारदाराची सहशिक्षक पदावर सेवा २४ वर्षे पूर्ण झाल्याने त्याला देय असणाऱ्या निवडश्रेणी मान्यतेकरिता दि. २५ ऑक्टोबर २०२३ रोजी योग्य मार्फतीने शिक्षणाधिकारी (माध्य), जि प सोलापूर यांच्या कार्यालयात त्याने प्रस्ताव सादर केला होता. याबाबत तक्रारदार हा वरिष्ठ सहायकाकडे पाठपुरावा करत होता. तक्रारदाराकडे या सहायकाने निवड श्रेणी मान्यतेसाठी यापूर्वी पाच हजार रुपये स्वीकारून रुपये ३०,०००/- आणून दिल्यावर मान्यतेसाठी प्रस्ताव वरिष्ठांकडे सादर करणार असल्याचे सांगितले.

प्राप्त तक्रारींवरून गुरूवारी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाईमध्ये त्या सहायकाने तक्रारदाराकडे ४०, हजार रूपये लाचेची मागणी करून तडजोडअंती रुपये ३२ हजार लाचेची मागणी केली. त्यापैकी पहिला हप्ता रुपये २० हजार स्वतः स्वीकारली असता त्यास रंगेहाथ पकडण्यात आले. तक्रारदाराने दि. ०६ फेब्रुवारी २०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सोलापूर येथे लिखित तक्रार दिली होती त्या अनुषंगाने गुरूवारीच शिक्षण विभाग (माध्य) जिल्हा परिषद, सोलापूर येथे पडताळणी केली असता आरोपींनी पंचासमक्ष ४०,०००/- रुपये स्वतः मागणी करून तडजोडीअंती रुपये ३२,०००/- मागणी केली आहे. तक्रारदार याच्याकडून स्वतःच्या कार्यालयात २०, हजार रु. पहिला हप्ता म्हणून पंचासमक्ष स्वीकारले असता त्याला रंगेहाथ पकडण्यात आले.

### अंग झडतीत मिळून आलेल्या वस्तू

**कार्यालयात त्या सहायकाची अंगझडती घेण्यात आली. त्यावेळी रुपये २२,०२०/- रोख रक्कम, मोबाईल फोन, मनगटी घड्याळ, स्वतः चे आधार कार्ड, पितळी अंगठी, रुमाल या वस्तू मिळून आले आहेत. वस्तू व सदरची रक्कम ताब्यात घेण्यात आली आहे. आरोपीच्या घरझडतीसाठी पथक तात्काळ रवाना करण्यात आलेले आहे. घरझडतीची प्रक्रिया सुरू आहे. सापळा कारवाईच्या दरम्यान तक्रारदार याच्या तक्रारीच्या अनुषंगाने सर्व कागदपत्रे प्राप्त करून ताब्यात घेतलेली आहे. आरोपी विरुद्ध सदर बझार पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून आरोपी अटक करून तपास करण्यात करण्यात येणार आहे. गणेश पिंगुवाले, पोलीस निरीक्षक, सहाय्यक फौजदार एस.व्ही. कोळी यांनी ही कारवाई केली.**

## पाणी डोळ्यात छे नव्हे; आता पोखरापूर शिवारात! पाण्याबरोबरच नशिबाचासुद्धा अखेर संपला वनवास!!



- चार दशकांच्या मागणीनंतर आले पाणी
- पाणी पूजन करुन बळीराजाने केला जल्लोष
- आनंदी आनंद गडे, जिकडे तिकडे चोहीकडे

सोलापूर/खास प्रतिनिधी

मोहोळ तालुक्यातील दुष्काळी पोखरापूर, खवणी अन् सारोळा शिवारात जिल्ह्याची वरदायिनी उजनी धरणातून पाणी यावे, अशी मागणी मागील चार दशके राहिली. पाण्यासाठी आग्रह धरणारे येथील नेते काळाच्या पडद्याआड गेले. तरीपण पाणी आले नाही. मात्र गुरुवारचा दिवस (दि.६) या परिसरातील शेतकऱ्यांसाठी जणू सोनियाचा उगवला. पोखरापूर उपसा सिंचन योजना टप्पा क्रमांक २ मधून पाणी या भागातील सिंचनासाठी प्रवाहित झाले. दुष्काळी पट्ट्यामुळे 'पाणी फक्त डोळ्यात' असेच चित्र येथील होते. मात्र आता पाणी छे; बळीराजाच्या डोळ्यात नव्हे, पोखपरापूर शिवारातसुद्धा, अशी किमया साधली गेली.

या परिसरात पोखरापूर उपसा सिंचन योजनेचे पाणी आल्याचे पाहिल्यानंतर शेतकऱ्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. अक्षरशः चातकाप्रमाणे ४० वर्षे पाण्याची वाट पाहिलेल्या या भागातील शेतकऱ्यांनी गुरूवारी येथे जल्लोष केला.'आनंदी आनंद गडे जिकडे तिकडे चोहीकडे' असे चित्र बघायला मिळाले.

पोखरापूर उपसा सिंचन योजना टप्पा २ मधून पोखरापूर तळ्यात पाणी आल्याने खवणी, पोखरापूर येथे आलेल्या पाण्याचे जलपूजन करुन शेतकऱ्यांनी जल्लोषासह आनंद साजरा केला. पोखरापूर तलावात आष्टी तलावाचे पाणी सोडण्यात यावे' या न्याय्य मागणीसाठी पोखरापूर, खवणी, सारोळे या गावच्या अनेक शेतकऱ्यांनी जवळपास ४० वर्षे अव्याहतपणे टोकाचा संघर्ष केला होता. याबाबत सरकारला अनेक वेळा निवेदने दिली, अनेक आंदोलने केली होती. यामध्ये कै. धोंडीबा (दादा) उन्हाळे, कै. सुरेश भोसले, स्वातंत्र्य सैनिक कै. नारायण गोले, कै नानासाहेब शिंगाडे, कै. विठ्ठल (आण्णा) पाथरुट, माजी आमदार राजन पाटील, माजी जि. प. उपाध्यक्ष दीपक गायकवाड, मच्छिंद्र काकडे, संजीव खिलारे, हरिदास पाथरूट, प्रभाकर देशमुख, सतीश काळे, चरणराज चवरे, रमेश माने, प्रा. श्रीधर उन्हाळे, बालाजी नरोटे, शाहीर सलगर, यशवंत नरोटे, हर्षद दळवे, बाळासाहेब भोसले, आशिष आगलावे, महादेव यमगर, अण्णा शिंदे, तुकाराम भोसले, आणि अनेक ज्ञात - अज्ञात मान्यवर, पंचक्रोशीतील शेतकरी, विविध पक्ष - संघटनांचे नेते व पदाधिकारी यांनी या पाण्यासाठी अविरत संघर्ष केला होता.

सतत अवर्षणग्रस्त व दुष्काळी भाग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या खवणी, सारोळे, पोखरापूर परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतात आष्टी तलावाचे पाणी आणण्याचे स्वप्न अनेक जाणकारांनी पाहिले. हे स्वप्न पाहणारे व दूरदृष्टी असलेले काही जाणकार शेतकरी नेते काळाच्या पडद्याआड गेले. परंतु आमच्या वाडवडिलांनी पाहिलेले स्वप्न पहायला आज ते हयात नाहीत याची खंत असली तरी त्यांचे स्वप्न आज अखेर पूर्ण झाले असल्याने परिसरातील अनेक शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे. यावेळी मोहोळ तालुका पंचायत समितीचे माजी सभापती व भाजपाचे ओबीसी सेलचे जिल्हा उपाध्यक्ष यशवंत नरोटे, भाजपा अनुसूचित जाती मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष संजीव खिलारे, दत्तात्रय काकडे, पोखरापूरचे सरपंच बालाजी नरूटे, खवणीचे मिस्टर संरपच महादेव यमगर, अंकुश दळवे (ग्रा. सदस्य), ज्ञानेश्वर काळे (माजी उपसरपंच), विक्रांत बाबर, संतोष कारंडे, पोपट भोसले, बापूराव उन्हाळे, उमाजी राऊत, पांडूरंग राऊत, लक्ष्मण राऊत, बंडू माने, गुंडिबा राऊत, नामदेव वाघमोडे, शिवाजी खिलारे, राहूल लेंगरे, वैभव खिलारे, सहदेव यमगर, लक्ष्मण तरटे, खवणीचे ग्रामसेवक मुजावर व परिसरातील ग्रामस्थ उपस्थित होते.

## खडकी येथे विवाहित तरुणाची आत्महत्या

मंगळवेढा : तालुक्यातील खडकी येथे राहणाऱ्या राजेश बाळू शिंदे (वय २५) या तरुणाचा छळ करून त्याला आत्महत्या करण्यासाठी प्रवृत्त केल्याच्या कारणावरून त्याच्या दोन मेहुण्यासह तिघांवर मंगळवेढ्याच्या पोलिसांनी नुकताच गुन्हा दाखल केला आहे. सुरेश दुर्योधन काळे, मिथुन दुर्योधन काळे आणि वैशाली काळे (सर्व रा. औसारी ता.इंदापूर) अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे आहेत. राजेश शिंदे याने २ फेब्रुवारी रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली होती. या संदर्भात त्याची आई दिलमाबाई शिंदे (रा. खडकी, ता.मंगळवेढा) यांनी पोलिसात नुकतीच फिर्याद दाखल केली. त्यांचा मुलगा राजेश याचा विवाह औसारी (ता. इंदापूर) येथील वैशाली हिच्याबरोबर झाला होता. ती माहेरी राहून नांदण्यास नकार देत होती. सहाय्यक फौजदार वाघमोडे पुढील तपास करीत आहेत.




## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



अरे किती...पडशील !!!

## मुंडेंच्या गळ्याभोवती गचछंतीचा फास

सोलापूर/विशेष प्रतिनिधी

राज्याचे मंत्री तथा बीड जिल्ह्यातील बडे राजकिय प्रस्थ असलेले धनंजय मुंडे यांच्यावर नानातऱ्हेचे आरोप होत आहेत. तरी देखील सबळ पुराव्याच्या नावाखाली त्यांना महायुतीच्या सरकारमधीलच बड्या नेत्यांनी आपल्या पंखाखाली घेत संरक्षणाची उब दिली. त्यामुळे मुंडेंनी कसेबसे ५५ दिवस लालदिव्यांचा आनंद लुटला पण आता नाही. मी त्यांची पहिली पत्नी आहे, असा ठामपणे दावा करणाऱ्या करुणा मुंडे यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार केल्याचे न्यायालयाने मान्य केल्यामुळे या सज्जड पुराव्याच्या आधारे सरकार मुंडेंचा राजीनामा मागू शकते.

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येत मुंडेंच्या निकटवर्तीयांचा हात असण्याचे प्रकरण, कृषी, पिकविमा घोटाळा या प्रकरणांत त्यांचा राजीनामा सरकारने घेतला नाही. मात्र, करुणा मुंडे प्रकरणात सरकार मुंडे यांचा राजीनामा मागण्याची शक्यता आहे.

एकनाथ शिंदे यांच्या मंत्रीमंडळात धनंजय मुंडे कृषिमंत्री होते. त्या कालावधीत त्यांनी मोठा भ्रष्टाचार केला, असा आरोप सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पुराव्यांनिशी केला आहे. त्यानंतर मुंडे आक्रमक झाले होते. त्यांनी दमानिया यांच्यावर पलटवार केला होता. गुरुवारी मात्र, मुंडे यांना धक्का बसला तो करुणा मुंडे यांच्यामुळे. करुणा ह्या धनंजय मुंडे यांच्या पहिल्या पत्नी आहेत, धनंजय मुंडेंनी त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचार केला, हे न्यायालयाने मान्य केले आहे. करुणा यांना दरमहा दोन लाख रुपयांची पोटगी द्यावी, असे आदेश न्यायालयाने धनंजय मुंडे यांना दिले आहेत. करुणा मुंडे यांनी त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचाराचा खटला दाखल केलेला आहे.



आपल्या बहिणीचे लैंगिक शोषण झाले, असा आरोपही करुणा मुंडे करत आहेत दोषी असल्याचे सिध्द झाल्याशिवाय राजीनामा घेणार नाही, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसने आधीच्या प्रकरणांत धनंजय मुंडे यांच्याबाबत घेतली आहे. आता गुरुवारच्या न्यायालयाच्या निर्णयानंतर पक्ष काय करणार, याकडे राज्याचे लक्ष लागून राहिले आहे.

कल्याण
678-14-149

मुंबई
880-64-239